वोक्हार्ट हॉस्पिटल, मुंबई या खाजगी संस्थेस राज्य शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना ऑर्थोपेडीक, मेंदू व मणक्याचे विकार यावरील शस्त्रक्रिया व उपचार करुन घेण्यास शासन मान्यता देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**

शासन निर्णय क्रमांकः- एमएजी २००५/९६५/प्र.क्र.२७२/आरोग्य-३
सार्वजनिक आरोग्य विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक - २७ जुलै, २००६.

**शासन निर्णय :-**

शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.एमएजी २००५/९/प्र.क्र.९/आरोग्य-३, दिनांक १९ मार्च, २००५ च्या परिच्छेद ४ मध्ये नमूद केल्यानुसार शासन मान्य खाजगी रुग्णालयाची यादी प्रस्तुत शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-'ब' मध्ये दर्शविण्यांत आली आहे. त्यामध्ये सुधारणा करुन वोक्हार्ट हॉस्पिटल, मुंबई या खाजगी संस्थेस राज्य शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना ऑर्थोपेडीक, मेंदू व मणक्याचे विकार यावरील शस्त्रक्रिया व उपचार करुन घेतल्यास, त्याप्रित्यर्थ होणा-या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करण्यास, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक जीरुखा २०००/प्र.क्र.१०१/आरोग्य-३, दिनांक २६.९.२००० मधील नमूद मार्गदर्शक तत्वांच्या अधिन राहून या निर्णयान्वये शासन मान्यता देण्यांत येत आहे. या अन्वये खालील बाबींचे प्रकर्षाने पालन प्रस्तुत संस्थेने करणे आवश्यक राहील :-

१) मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० मधील कलम ४१ अे नुसार खाजगी रुग्णालयांनी १०% रुग्णांवर मोफत व १०% रुग्णांवर सवलतीच्या दराने उपचार करणे.

२) मुंबई नर्सिंगहोम अधिनियम १९४८ अन्वये विहित केलेल्या निकषानुसार प्रशिक्षित वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वर्ग उपलब्ध असणे.

३) खाजगी रुग्णालये/संस्थेमध्ये ज्या आजारावर उपचार करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. त्या आजाराचे संशोधन करण्यासाठी तसेच चाचण्यांच्याअंती झालेल्या निदानानुसार शस्त्रक्रिया करण्यासाठी आवश्यक ती यंत्रसामुग्री व साधनसामुग्री उपलब्ध असणे.

४) शासकीय रुग्णालयात ज्या दराने फी आकारली जाते त्या दराने फी आकारली जावी.

५) खाजगी रुग्णालये/संस्थेने भारत/राज्य सरकारमार्फत कार्यान्वित केलेल्या राष्ट्रीय कार्यक्रमांच्या मोहिमेत सक्रिय भाग घेणे आवश्यक आहे.

२. उपरोक्त आजारावरील उपचार व औषधोपचाराकरिता वोक्हार्ट हॉस्पिटल, मुंबई या संस्थेने आकारलेल्या संपूर्ण वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील. अतितातडीची बाब वगळता सदर संस्थेतील मान्यताप्राप्त उपचाराखेरीज अन्य कोणत्याही औषधोपचारासाठी शासकीय कर्मचाऱ्यास प्राधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्यांची पूर्वसंमती घेणे आवश्यक राहील.

३. हे आदेश मा.मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मा. मंत्री, मा. राज्यमंत्री महोदय, महाराष्ट्र विधानमंडळाचे विरोधी पक्ष नेते, महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती, उपसभापती तसेच महाराष्ट्र विधानसभा/परिषदेचे विद्यमान सदस्य, माजी सदस्य व त्यांच्या कुटुंबियांना सुध्दा अनुज्ञेय ठरविण्यांत येत आहेत.

४. हे आदेश शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( र. मो. आडे )
कार्यासन अधिकारी

प्रति :-मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई. / प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग), मंत्रालय, मुंबई. / सचिव, राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई
मुख्यमंत्र्यांचे सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई. / मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई.
मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई. / राज्यमंत्री (आरोग्य) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक. / मुख्य सचिवांचे स्वीय सहाय्यक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
सेटलमेंट कमिशनर ॲण्ड डायरेक्टर ऑफ लँड रेकॉर्डस्, पुणे
विभागीय आयुक्त (सर्व) / जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद (सर्व)
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा), मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा), नागपूर
सहसंचालक, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
चिफ ऑडिटर, लोकल फंडस् अकाऊंटस्, मुंबई
कोषागार अधिकारी (सर्व)
महासंचालक, आरोग्य सेवा, मुंबई / संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
संचालक, आयुर्वेद, मुंबई / संचालक, राज्य कामगार विमा योजना, मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, हाफकीन बायो-फार्मास्युटीकल कॉर्पोरेशन, परेल, मुंबई
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (सर्व)
महासंचालक, माहिती व जनसंपर्क मंत्रालय, मुंबई
सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व) / उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)
अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, (सर्व) / जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, (सर्व)
* प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई
* प्राथोनोटरी व सिनियर मास्टर, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई
वित्त विभाग (कार्यासन सेवा-५), मंत्रालय, मुंबई / व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती रुग्णालय, मुंबई
सर्व कार्यासन अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना कार्यासन), मंत्रालय, मुंबई.
डॉ.लॉएड नाजरेथ, जनरल मॅनेजर, वोक्हार्ट हॉस्पिटल, मुलुंड, गोरेगाव लिंक रोड, मुंबई - ४०० ०७८.

२. मंत्रालयीन विभागाच्या सर्व आस्थापना कार्यासनास विनंती करण्यात येते की, त्यांनी शासन निर्णयाच्या प्रती त्यांच्या सर्व संबंधित कार्यासनांना पाठवाव्यात. तसेच संबंधित कार्यासनाने त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभागप्रमुख व कार्यालय प्रमुख यांना पाठवाव्यात.

निवडनस्ती (आरोग्य-३), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
(* - पत्राद्वारे)

H 1298-1 ST (A)